# मेट्रो-३ पावसाचा सामना करण्यास सज्ज

## मुंबईत पाणी तुंबणार नसल्याचा दावा

मुंबई (प्रतिनिधी) :

शहरात ठिकठिकाणी मेट्रोची कामे सुरू असल्याने यंदा पावसाळ्यात अनेक ठिकाणी पाणी साचण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र, पावसाळ्यात मेट्रो कामामुळे मुंबईकरांची गैरसोय टाळण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कंबर कसली आहे. मेट्रो ३च्या कामामुळे मुंबईत पाणी तुंबणार नाही, यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत.

मुंबई मेट्रो-३चे अधिकारी व मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी मुंबई मेट्रो ३ च्या बांधकाम स्थळांना संयुक्त भेटी दिल्या आणि मान्सूनपूर्व कराव्या लागणाऱ्या कामांचा कृती आराखडा तयार केला आहे. त्या आराखड्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अभियंत्यांनी आणि कंत्राटदारांनी मान्सूनपूर्व कामाला सुरुवात केली आहे. सर्व कामे प्रगतिपथावर असून, पावसाळा सुरू होण्यापूर्वी ती कामे पूर्ण होतील. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढणे तसेच कॅच पिट्स बांधणे अशी कामे प्रगतिपथावर आहेत.

याशिवाय पावसाळ्यात वाहतुकीमध्ये अडथळा येऊ नये यासाठी दिशादर्शकांची पुन्हा रंगरंगोटी करणे, बॅरिकेड्स स्वच्छ करून दृष्यमानता वाढवणे, कामाच्या आजूबाजूचे रस्ते सुस्थितीत ठेवणे यासारखी कामे युद्धपातळीवर चालू असून ती महिनाअखेरीपर्यंत पूर्ण होतील.

मेट्रो ३च्या बांधकामामुळे मुंबईकरांची कोणतीही गैरसोय होणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहोत. सखल भागात सर्व प्रकारची आपत्कालीन उपकरणे आणि वाहने सज्ज राहतील. ज्यामुळे वाहतूक किंवा पाणी तुंबण्यासंबंधित कोणतीही समस्या उद्‌भवणार नाही, अशी माहिती एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी दिली.

बांधकाम स्थळी साठलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात येणार आहे. दोन अभियंते व पर्यवेक्षक असलेला आपत्कालीन प्रतिसाद चमू प्रत्येक बांधकाम स्थळावर २४ तास तैनात राहील. याशिवाय पालिकेचे स्थानिक कार्यालय आणि आपत्कालीन व्यवस्थापन विभागाशी दररोज समन्वय साधला जाईल. मान्सून संबंधी तक्रारी नोंदविण्याकरिता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संकेतस्थळावर दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करण्यात येईल.